*This Question Paper contains 16 printed pages.*
***(Part - A & Part - B)***

Sl.No. 0100101

# 03(M)

(MARCH, 2019)
(Old Course)

| પ્રશ્ન પેપરનો સેટ નંબર જેની સામેનું વર્તુળ OMR શીટમાં ઘટ્ટ કરવાનું રહે છે. Set No. of Question Paper circle against which is to be darken in OMR sheet. |
|---|
| **01** |

**Part - A : Time : 1 Hour / Marks : 50**
**Part - B : Time : 2 Hours / Marks : 50**

## (Part - A)

***Time : 1 Hour]*** ***[Maximum Marks : 50***

**सूचना :**

1) दिलेल्या प्रश्न पत्रिकेत **Part – A** मध्ये वस्तुनिष्ठ प्रकारचे एकून **50** प्रश्न आहेत. सर्व प्रश्न आवश्यक आहे.
2) प्रश्नांची क्रम संख्या 1 ते 50 आहे. प्रत्येक प्रश्नाला 1 गुण आहेत.
3) प्रश्न पत्रिका ठिक पद्धतीने वाचने आणि योग्य पर्याय / विकल्प लिहा.
4) आपल्याला वेगळे दिलेले **O.M.R.** शिट मध्ये प्रश्नाच्या समोर **(A) O, (B) O, (C) O** आणि **(D) O** दिले आहे. ज्या प्रश्नाचे उत्तर योग्य आहे, ते विकल्पास गोलाकारा पेनने पूर्ण घट्ट (●) करायचे आहे.
5) दिलेल्या प्रश्नपत्रिकेत वरच्या बाजूस प्रश्न पत्र शीट नंबरला **O.M.R.** शीट मध्ये उपलब्ध स्तंभ (कॉलम) मध्ये लिहा.

---

1) पाखाला बालक पांगुरवणे पाठाचा साहित्यप्रकार सांगा?
 (A) बखर वाङ्मय
 (B) प्राचीन गद्य
 (C) वैचारिक निबंध
 (D) आत्मकथानात्मक

2) मोगलांच्या घोड्यांना पाण्यात काय दिसत असे?
 (A) धनाजी व संताजी
 (B) तानाजी
 (C) शिवाजी
 (D) बाजीप्रभू

3) 'कष्टचि नाही ते निर्फळ' असे कोणी म्हटले आहे?

(A) श्री समर्थ

(B) संत तुकाराम

(C) संत ज्ञानेश्वर

(D) संत एकनाथ

4) विठूने दमडीला काय दिले?

(A) खडीसाखर

(B) खोबऱ्याचा तुकडा

(C) लाडू

(D) पेढे

5) प्रार्थनेत कोणते पद म्हटले गेले?

(A) वंदे मातरम्

(B) वैष्णव जन

(C) सरस्वती स्तवन

(D) गणेश वंदना

6) शर्मिष्ठाच्या दृष्टीकोणातून दासीपण म्हणजे काय?

(A) माणसाच्या अभिमानाचे मरण

(B) माणसाच्या माणुसकीचे मरण

(C) माणसाच्या अहंकाराचे मरण

(D) माणसाच्या प्रतिष्ठेचे मरण

7) जुलेखाच्या वडिलांचे नाव काय होते?

(A) औरंगजेब

(B) अजमलखान

(C) शाहिस्तखान

(D) रसुलनखान

8) आंगण या पाठाचे लेखक कोण?

(A) मधुकर केचे

(B) जयवंत दळवी

(C) वि. स. खांडेकर

(D) पु. ल. देशपांडे

9) स्पेस शटल भारतातील कोणत्या ठिकाणावरून सुटले होते?

(A) मद्रास

(B) कलकत्ता

(C) दिल्ली

(D) श्रीहरिकोटा

10) सरपंच कोठे गेले होते?

(A) ग्रामपंचायतेत

(B) खानावळीत

(C) मंदिरात

(D) सरकारी सोसायटीत

11) दिगंतने कोणता निर्णय घेतला?

(A) हेमलकशाच्या कार्याला जीवन अर्पण करण्याचा

(B) आश्रम स्थापण्याचा

(C) गरीबांना मदत करण्याचा

(D) दवाखान्यात नोकरी करण्याचा

12) स्वामीजीना सर्वात प्रथम कोणी मदत केली?

(A) श्रीमती सनबर्नबाई

(B) प्रा. जे. एच. राईट

(C) मॅंडल हेल

(D) डॉ. रॉकफेलर

13) काका केणी आधी कोणत्या नाटकात काम करीत होते?

(A) जन्मकुंडली

(B) वाहतो ही दुर्वाची जुडी

(C) उभा जन्म उन्हात

(D) सभ्य गृहस्थ हो

14) महादेवकरांचे ठरलेले वाक्य कोणते होते?

(A) ऊन खूप होते

(B) 'जरा उशीर झाला दादासाहेब'

(C) फूले आणली आहेत

(D) पूजा लवकर करतो

15) एस. टी. कोणत्या गावाला थांबली?

(A) औरंगाबाद (B) उपळाई

(C) उकडगाव (D) सोनगाव

16) 'तेयापरी श्रोता' या काव्यात कोणत्या पक्षांचा उल्लेख केला आहे?

(A) गरूड (B) मोर

(C) चकोर (D) बाज

17) कोणाला पाहून सीतेच्या मनाला त्रास झाला?

(A) राम (B) रावण

(C) लक्ष्मण (D) दशरथ

18) गीतातील स्त्री कोणाजवळ घागर मागते?

(A) नगरमाशाकडे (B) देवाकडे

(C) वडिलांकडे (D) मैत्रिणीकडे

19) 'पुष्पे वनांत कसली खुडितो फिरोन? ही काव्य-पंक्ती कोणत्या काव्यातील आहे?

(A) वैभव (B) सृष्टि आणि कवि

(C) तेथे कर माझे जुळती (D) अन्योक्ती

20) कविचे किती पाने वाचून झाली?

(A) एक (B) दोन

(C) चार (D) तीन

21) 'नवी मळवाट' या काव्याचा साहित्यप्रकार सांगा?

(A) भाव कविता (B) निसर्ग कविता

(C) साम्यवादी कविता (D) ग्रामीण कविता

22) 'शांत किनारा' यातील वारा कसा वाहतो?

(A) बेफाम (B) चुंबन घेत

(C) भरभर (D) शांत

23) कवीचे हात कोणाकडे गहाण राहिलेत?

(A) द्रारिद्याकडे (B) स्व:ताकडे

(C) सावकाराकडे (D) दुनियेकडे

24) देव आहे तो पर्यंत काय निषिब्ध्द आहे?

(A) पाप (B) पुण्य

(C) वैताग (D) समृध्दी

25) बैलातील चैतन्याचे नाते कुणाशी जुळले आहे?

(A) सूर्याशी (B) शेताशी

(C) तिफणाशी (D) घराशी

26) गावच्या पाण्याला काय सोसवत नाही?

(A) समुद्राची ओढ

(B) दूरवरची खेप

(C) आकाशाची झेप

(D) वाकडे वळण

27) रस्त्यांना काय ठाऊक आहे?

(A) काटे-कुटे

(B) खाच-खळगे

(C) घरे

(D) दगड-धोंडे

28) 'भला जन्म तुला लाधला' यात कविने मानवाला कशाची उपमा दिली आहे?

(A) माणसाची

(B) माकडाची

(C) साधूची

(D) देवाची

29) वनातील सिंहाला कशाची इच्छा आहे?

(A) झोपण्याची

(B) खाण्याची

(C) हत्तीचे गंडस्थळ फोडण्याची

(D) वनात फिरण्याची

30) बहिणाबाईच्या मते संतास कसे ओळखावे?

(A) जो दुसऱ्याच्या दु:खात आपले दु:ख मानतो

(B) जो मंदिरात जातो

(C) जो किर्तन करतो

(D) जो पूजापाठ करतो

31) यथाशक्ती प्रमाणे दान करावे–अधोरेखित–समासाचा प्रकार ओळखा.

(A) द्विगू समास

(B) द्वंद्व समास

(C) अव्ययीभाव समास

(D) तत्पुरूष समास

32) नात्याची किंवा आप्तसंबंधी मंडळी–शब्दसमूहासाठी एक शब्द.

(A) गोतावळा

(B) नातेसंबंध

(C) भाऊ–बंदगी

(D) कुटूंब

33) 'पेटविले पाषाण पठारावरती शिवबांनी–वाक्यातील अलंकार ओळखा.

(A) उत्प्रेक्षा

(B) अनुप्रास

(C) उपमा

(D) यमक

34) व्यतिरेक अलंकाराचे उदाहरण दर्शवा.

(A) पहा पाखरे चरोनि होती झाडांवर गोळा

(B) आभाळागत माया तुझी आम्हावरी राहू दे ।

(C) अमृताहूनी ही गोड । नाम तुझे देवा ।।

(D) शंकरास पुजिले सुमनाने

35) कलकल कल हंसे फार केला सुटाया – या ओळीतील वृत्त ओळखा.

(A) पृथ्वी (B) मंदाक्रांता

(C) मालिनी (D) भुजंगप्रयात

36) खालील काव्यपंक्तीतील शार्दुलविक्रीडित वृत्ताचे उदाहरण ओळखा.

(A) मेघांनी हे गगन भरता गाढ आषाढमासी

(B) कोठे उज्जयिनी पुराणनगरी संपन्न राजवन्ती ।

(C) सुसंगती सदा घडो, सुजनवाक्य कानी पडो ।

(D) सदा सर्वदा योग तुझा घडावा ।

37) जीव उडून जाणे – वाक्यप्रचाराचा अर्थ:

(A) भीती वाटणे

(B) मृत्यु येणे

(C) ठेच लागणे

(D) जीव घाबरणे

38) 'कोळसा उगाळावा तितका काळाच' – या म्हणीचा अर्थ ओळखा.

(A) कोळसा काळाच असतो

(B) कोळसा घासल्यानंतर काळाच रंग येतो

(C) वाईट गोष्ट ही शेवटपर्यत वाईटच असते

(D) भांडणात दोष एका पक्षाकडेच असत नाही

39) कोणता शब्द समानार्थी नाही ते ओळखा.

(A) साप (B) सर्प

(C) अही (D) मुंगुस

40) विसंवाद शब्दाचा विरूध्दार्थी शब्द ओळखा.

(A) सुसंगती
(B) सुवाक्य
(C) सुसंवाद
(D) संस्कार

41) रमाने अभ्यास केला – अधोरेखित शब्दातील विभक्ती प्रत्यय ओळखा.

(A) तृतीया
(B) चतुर्थी
(C) प्रथमा
(D) पंचमी

42) 'फुफाटा' या ग्रामीण शब्दासाठी रूढ मराठी शब्द द्या.

(A) धूळ
(B) धूर
(C) फुकट
(D) फार

43) 'प्रकाशचे वागणे बेगडप्रमाणे होते. – या वाक्यातील काळ ओळखा.

(A) वर्तमानकाळ
(B) भूतकाळ
(C) भविष्यकाळ
(D) अपूर्ण वर्तमानकाळ

44) मी पहाटे पाच वाजता उठतो व एक तास व्यायाम करतो :– वाक्याचा प्रकार ओळखा.

(A) केवलवाक्य
(B) संयुक्तवाक्य
(C) मिश्रवाक्य
(D) मिश्र–संयुक्तवाक्य

45) 'केवढी उंच इमारत ही'। – विधानार्थी वाक्य ओळखा.

(A) ही इमारत खूप उंच आहे

(B) इमारत लहान नाही

(C) इमारत सामान्य नाही

(D) इमारतीची उंची चांगली आहे

46) भावेप्रयोगाचे उदाहरण ओळखा.

(A) राधाने चिंच खाल्ली

(B) मोहनने बैलास मारले

(C) ते गाणे गातात

(D) तो निबंध लिहतो

■ **अपठित गद्य उतारा वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या? (47 आणि 48)**

बागेतील झाडावर उमललेले एखादे टपोरे फूल असते. त्याचा सौम्यसा सुगंध आल्हाददायक असतो. त्याच्या नाजूक पाकळ्या आणि सुरेख रंग डोळ्यांना सुखावतात हा छोटासा अनुभव घेतांना आपले मन प्रसन्न होऊन जाते. इवल्याशा फांदीवर उमलंणारे फुल वाऱ्याचा लहरींनी–झुलणारे, त्याच दिवशी संध्याकाळी कोमेजून जाते हे खरे । पण त्यामुळे त्याचे दिवसाभरातील अस्तित्व आणि लोकांना दिलेला आनंद या गोष्टी खोट्या ठरत नाहीत.

47) फुलाचा सुगंध कसा आहे?

(A) उग्र

(B) सौम्य

(C) सुंदर

(D) सुरेख

48) आपले मन कशाने प्रसन्न होते?

(A) फुलाच्या सुगंधाने

(B) नाजूक पाकळ्या व रंगाने

(C) बागेत फिरल्याने

(D) वाऱ्याच्या लहरीने

■ **खालील काव्यपंक्ती वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या. (49 आणि 50)**

गावाखालती बारव । तिथे सया पाणी भरिती ।

गरगर घागर चक्री चुंबळ । हात वारिती पाणी भरिती ।

घागर बुडाली चुंबळ तरंगली । नगरमाशान दे माझी घागर ।

49) विहिर कोठे आहे?

(A) गावाखाली

(B) गावात

(C) नदीपलीकडे

(D) गावाच्या आत

50) चुंबळ कशी आहे?

(A) चौरस

(B) गोल

(C) त्रिकोणी

(D) लंबचौरस

# 03(M)

(MARCH, 2019)
(Old Course)

## (Part - B)

*Time : 2 Hours]* *[Maximum Marks : 50*

**सूचना :**

1) हस्ताक्षर स्पष्ट लिहा.
2) प्रश्नपत्रिकेत **Part - B** मध्ये चार विभाग आहेत आणि एकूण **1** ते **13** प्रश्न आहेत.
3) सर्व प्रश्न आवश्यक आहेत. या मध्ये पर्याय दिले आहेत.
4) उजव्या बाजूला प्रश्नाचे गुण दिले आहेत.
5) नविन विभाग नव्या पानावर लिहावे.
6) प्रश्नांचे उत्तर क्रमानुसार द्यावे.

### विभाग – अ

■ **खालील प्रश्नांचे दहा – बारा वाक्यात मुद्देसूद उत्तरे लिहाः** **[4]**

1) लेखकाच्या मते जगात किती प्रकारची माणसे आढळतात? त्याचे वर्णन करा?

किंवा

प्रकाशचे स्वागत आईने कसे केले?

■ **खालील प्रश्नांचे दोन – तीन वाक्यात उत्तरे द्या.** **[4]**

2) शर्मिष्ठेच्या हातून कोणती चूक घडली?

3) भारतातर्फे यानाला 'शशांक' असे नाव का सुचविण्यात आले होते?

किंवा

बाळकृष्णाचे जेवण पाहून ललिताच्या मनात कोणते विचार आले?

■ **खालील प्रश्नांचे आठ – दहा वाक्यात मुद्देसुद उत्तरे लिहा :** [3]

4) ‘पुस्तकातील खूण’ या शीर्षकाची समर्पकता सविस्तर स्पष्ट करा.

किंवा

कविला दिव्यत्वाची प्रतीती कोठे कोठे येते?

■ **खालील प्रश्नांचे दोन – तीन वाक्यात उत्तरे द्या.** [4]

5) सीतेने कुलदेवाची प्रार्थना का केली?

6) शुक पुन्हा पुन्हा कोणत्या सुखाची आठवण करतो? का?

किंवा

कवीचे दोन दिवस कसे गेले?

## विभाग – ब

■ खालील अपठित परिच्छेद वाचून त्याचा एक तृतीयांश (1/3) भागात सारांश लिहा व त्यास योग्य शीर्षक द्या: [5]

7) प्रत्येक वस्तूकडे आम्ही पैशाच्या माध्यमातून पहात असतो. वस्तूसाठी पैसा पेरला गेला पाहिजे, अशी आमची धारणा. पैशाविना निसर्ग जी गोष्ट निर्माण करतो अशी वस्तू ही पैशांनी – डागाळून टाकतो. आम्ही झाडे विकत घेतो, राजे विकत घेतो, माणसे ही विकत घेतो. शक्य असते तर आम्ही इंद्रधनुष्य व निळे आकाश ही विकत घेतले असते, त्यावर रंगाचे कारखाने काढले असते. आमची भूमी विकत घेण्याची–भाषा तर आमच्या क्षुद्रतेचा, मूर्खतेचा परमोच्च बिंदू दाखविते, वस्तुतः आमच्या अस्तित्वाला एकमेव आधार देणाऱ्या भूमीने आम्हास निर्माण केले. तिचे अन्न, पाणी पिऊन आम्ही जगतो. पण आमची भाषा मात्र भूमी विकत घेण्याची असते. भूमीच्या उदरातून धातू काढून त्याच धातूच्या नाण्यांनी आम्ही भूमी विकत घेतो, तिचे–स्वामित्त्व सांगतो, शक्य असते तर चंद्र, सूर्य, तारे ह्या साऱ्यांनाच आम्ही तागडीत तोलून फूंकून टाकले असते. खरोखर आमचा आवाका आणि आमचे स्थानच आम्ही ओळखले नाही। कशाला मोल लावावे आणि कशाला मोल लावू नये हेच आम्हाला उमगले नाही.

■ खालील अपठित कविता वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. [5]

8) तिन्ही लोक आनंदाने भरून जाऊ दे रे
तुझे गीत गाण्यासाठी सूर लावू दे रे ।।धृ।।
शुभ्र फुले माळून आल्या निळ्या निळ्या लाटा
रानफुले लेऊनि सजल्या या हिरव्या वाटा
या सुंदर यात्रेसाठी मला जाऊ दे रे ।।१।।
मोर केशराचे झुलती पहाटेस दारी
झऱ्यातुनी दिडदा दिडदा वाजती सतारी
सोहळ्यात सौंदर्यांचा तुला पाहू दे रे ।।२।।
शांत शांत उत्तररात्री मंद मंद तारे
तुझे प्रेम घेऊनि येती गंध धुंद वारे
चांदण्यात आनंदाच्या मला व्हाऊ दे रे ।।३।।
एक एक नक्षत्राचा दिवा लागताना
आणि फुले होण्यासाठी कळ्या जागताना
पौर्णिमा स्वरांची माझ्या तुला वाहू दे रे ।।४।।
– मंगेश पाडगावकर

प्रश्न :–

अ) कवीला कोणत्या गोष्टी कराव्याशा वाटतात?

ब) कवीने निसर्गातील कोणत्या सुंदर गोष्टीचे वर्णन केले आहे?

क) हिरव्या वाटा कशाने सजल्या आहेत?

ड) कवीने रात्रीचे वर्णन कशा रितिने केले आहे?

इ) कवितेला समर्पक शीर्षक द्या?

## विभाग – क

9) परगावी असलेल्या तुमचा मित्र आजारी असल्या मुळे परीक्षेस बसू शकला नाही. त्याच्या खिन्न मनाचे सांत्वन करणारे पत्र लिहा. [5]

(पत्ता : 401, गजानन अपारमेंट, – शिवाजी मार्ग अहमदाबाद – 5)

(सूचना : पत्रात तुमचे नांव, पत्ता किंवा सहीचा उल्लेख करू नये)

10) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर कल्पना–विस्तार लिहा. [5]

अ) 'यत्न तो देव जाणावा' ।

ब) मरणात खरोखर जग जगते

## विभाग - ड

11) सूचने प्रमाणे करा :- [3]

- खालील शब्द शुध्द करून लिहा :
  सौंसार, ग्रहपाठ

- संधी सोडवा :
  यशोधन, पित्राज्ञा

- संधी करा :
  वृक्ष + औदार्य, जगत् + नाथ

12) खाली दिलेल्या मुद्यावरून 100 शब्दांत गोष्ट तयार करा व त्यास योग्य शीर्षक द्या : [4]

अ) मुद्दे :-
सिंह ......... कोल्हा व कुत्रा ........... मैत्री ........... करार ............ सर्वांनी मिळून शिकार ........... सारखी वाटणी ......... हरणाची शिकार ........ वाद ....... सिंहाची युक्ती .......... तीन ही वाटे लुबाडतो ........ कुत्रा व कोल्हा उपाशी.

किंवा

ब) तुमच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी 'श्रमदान' शिबिरात भाग घेतल्याचा अहवाल लिहा.

13) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे 200 शब्दांत निबंध लिहा. [8]

- नको तो भ्रष्टाचार

  मुद्दे :-

  भ्रष्टाचार आज प्रत्येक क्षेत्रात – भ्रष्टाचारी माणसाला स्वत:च्या शीलाची किंमत नाही – पूर्वीच्या सुखी जीवनाच्या कल्पना – आताच्या सुखी जीवनाच्या वाढत्या गरजा – मनावरील संयम – कमी श्रमात जास्त पैसा – भेसळ – प्रत्येक वस्तुत भेसळ – भ्रष्टाचार लक्ष्मी दिल्याविना नोकरी नाही – महत्वाच्या हृदयावरचे भ्रष्टाचारी – आजच्या तरूण पिढीने भ्रष्टाचार गाडला पाहिजे – राष्ट्रभक्ती ही हवीच.

- पाऊस पडला नाही तर :

  मुद्दे :-

  पावसाचे महत्त्व – पिण्यासाठी, शेतीसाठी, वीजनिर्मिती, पाणी – 'पाणी हेच जीवन' – नदी, नाले, कोरडे – मानव, पशुपक्षी, निसर्ग सर्वांवर मरणकळा – निर्जीवता – महागाई – भीषणता – कल्पनाच भयंकर.

▽▽▽▽